# घटक ३ विकासाचे देशांतर्गत मोजमाप

**३.० प्रास्ताविक**

**३.१ उद्दिष्टे**

**३.२ भांडवल निर्मिती**

३.२.१ भांडवल निर्मितीचा अर्थ आणि वैशिष्ट्ये

३.२.२ भांडवल निर्मितीचे मार्ग (स्त्रोत)

३.२.३ भांडवल निर्मितीचा दर अल्प असण्याची कारणे

**३.३ किंमत धोरण**

३.३.१ किंमत धोरणाची उद्दिष्टे

३.३.२ किंमत धोरणाची साधने

**३.४ आर्थिक विकासात राज्याची भूमिका**

३.४.१ संस्थात्मक बदल

३.४.२ संघटनात्मक बदल

**३.५ सारांश**

**३.६ पारिभाषिक शब्द**

**३.७ आदर्श उत्तरे (आपली प्रगती तपासा)**

**३.८ स्वाध्याय**

**३.९ संदर्भ**

## ३.० प्रास्ताविक

विद्यार्थी मित्रांनो, या आधीच्या घटकात आपण विकासाचे सिद्धांत जाणून घेतले आहेत. या घटकात आपण विकासाचे देशांतर्गत मोजमाप करणाऱ्या घटकाचा अभ्यासणार आहोत. जगामध्ये प्रामुख्याने विकसीत देश, विकसनशील देश आणि अल्पविकसीत देश अशा तिन प्रकारे विभागणी केली जाते. प्रामुख्याने अल्पविकसित देश जेव्हा आर्थिक विकास करावयास निघतात तेव्हा त्यांना आर्थिक विकासाच्या पूर्वावश्यक अटीकडे किंवा आधारभूत संरचनेकडे लक्ष देणे आवश्यक ठरते. आर्थिक विकास हा देशातील सामाजिक व राजकीय परिस्थिती कशी आहे, याच्याशी निगडीत आहे. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत देशातील कायदे व सुव्यवस्थेची स्थापना, सामाजिक व्यवहारातील आचारशिलता, व्यक्तीचा परिवाराशी येणारा संबंध, लोकांची साक्षरता, लोकांना यंत्र वापराचे ज्ञान इत्यादी घटक महत्त्वपुर्ण ठरत असतात.

**आर्थिक विकासाचा अर्थ:** जेव्हा राष्ट्रातील लोकांचे दरडोई उत्पन्न वाढून त्यांच्या जीवनमानात, राहणीमानात सुधारणा होते तेव्हा आर्थिक विकास झाला असे म्हणता येईल. देशात कारखाने, उद्योगधंदे, दळणवळणाची साधने या मध्ये होणारी वाढ म्हणजे आर्थिक विकास होय असाही अर्थ आपणास लावता येतो.

आर्थिक विकास ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. तसेच ती अल्पकालीन नसून दिर्घकालीन प्रक्रिया आहे. आर्थिक विकास ही संपूर्ण राष्ट्राच्या संदर्भातील वापरली जाणारी संकल्पना आहे.

आर्थिक विकासामध्ये देशांतर्गत घटक जसे महत्त्वपूर्ण असतात तसेच बाह्य घटक सुद्धा महत्त्वपुर्ण असतात. बाह्य घटकामध्ये विदेशी भांडवल, आंतरराष्ट्रीय व्यापार, आंतरराष्ट्रीय संस्थांची मदत इत्यादी घटकांचा समावेश होतो. बाह्य घटक आर्थिक विकासाला प्रोत्साहीत करू शकतात, परंतु आर्थिक विकासाचे सातत्य टिकवू शकत नाही. म्हणुन आर्थिक विकासामध्ये देशांतर्गत घटकांनाच फार महत्त्व असते. आर्थिक विकासासाठी विदेशी मदतीपेक्षा देशातील उपलब्ध साधनसंपदेचा वापर करणे जास्त फायदेशीर ठरते. प्रो. केर्नक्रास म्हणतात 'विकास जर लोकांच्या मनात नसेल तर तो होऊच शकत नाही.' विद्यार्थी मित्रांनो विकास प्रक्रियेमध्ये देशातंर्गत भांडवल निर्मिती, किंमत धोरण व विकासामधील राज्याची भूमिकाचे विश्लेषण या घटकाचा आपण अभ्यास करणार आहोत.

**३.१ उद्दिष्टे:** विद्यार्थी मित्रांनो या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास

१. भांडवल निर्मितीचा अर्थ आणि वैशिष्ट्ये समजण्यास मदत होईल.

२. भांडवल निर्मितीचे विविध मार्ग लक्षात येतील.

३. अल्पविकसीत देशात भांडवल निर्मितीचा दर कमी असण्याची कारणे स्पष्ट होतील.

४. किंमत धोरणाची उद्दिष्टे आणि साधने यांची माहिती मिळेल.

५. आर्थिक विकासात संस्थात्मक बदल व संघटनात्मक बदल यांचे महत्त्व लक्षात येईल.

## ३.२ भांडवल निर्मिती (Capital Formation)

देशाचा आर्थिक विकास साधण्यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवली साठा व भांडवली वस्तूंची आवश्यकता असते. देशात भांडवल निर्मिती जेवढी जास्त होईल तेवढा आर्थिक विकासाचा दर जास्त राहील. प्रो. कुजनेट्स यांच्या मते, 'भांडवल निर्मिती आर्थिक विकासासाठीची आवश्यक अट आहे.' अल्पविकसीत देशात नैसर्गिक साधनसामुग्री आणि लोकसंख्या मोठ्या प्रमाणात उपलब्ध असते परंतू भांडवल निर्मितीच्या अभावी या घटकांचा वापर त्या देशात होत नाही. अल्पविकसीत देशात गरीबीचे दुष्टचक्र प्रचलीत असते ते कसे तोडावे ही एक समस्या त्यांच्या समोर असते. भांडवल निर्मितीच्या साहाय्याने अल्पविकसीत देशातील गरीबीचे दुष्टचक्र तोडता येऊ शकते. भांडवल निर्मितीमध्ये वाढ केल्यामुळे देशात उपलब्ध असलेल्या साधन संपत्तीचा वापर करता येतो. त्यामुळे देशातील लोकांना रोजगार मिळण्यास मदत होते. लोकांना रोजगार मिळाल्यास त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होऊ शकते.

**३.२.१ भांडवल निर्मितीचा अर्थ आणि वैशिष्ट्ये:** भांडवल निर्मितीचा अर्थ विचारात घेण्यापुर्वी भांडवल म्हणजे काय? हे समजूण घेणे आवश्यक आहे. उत्पादनामध्ये वाढ करण्यासाठी ज्या मानव निर्मित साधनांची आवश्यकता असते अशा सर्व साधनांना भांडवल असे म्हणतात. 'भांडवल' ही संज्ञा साधारणपणे यंत्र व सयंत्र, अवजारे, कारखाने, इमारत, कालवे, विद्यूत इत्यादीसारख्या वस्तूकरिता वापरली जाणारी संज्ञा आहे. संपत्तीच्या अधिक उत्पादनाकरिता संपत्तीचा जो भाग उपयोगात आणला जातो त्या भागाला भांडवल असे म्हणतात.

प्रो. क्लार्क यांच्या मते, "भांडवल म्हणजे उत्पादन करण्याच्या उद्देशाने वापरण्यात येणारी पुर्व उत्पादनीय संपत्ती होय."

थोडक्यात वस्तुच्या निर्मितीकरिता वापरण्यात येणाऱ्या साधनांना भांडवल असे म्हणता येईल. भांडवलामध्ये केवळ पैशाचा समावेश होत नाही तर इतर उत्पादन साधनांचा समावेश भांडवलामध्ये होत असतो.

भांडवल म्हणजे काय याचा अर्थ समजून घेतल्यानंतर भांडवल निर्मिती म्हणजे काय? ते पहावे लागेल. भांडवली वस्तू किंवा भांडवली साधने यांची अधिक निर्मिती करणे यालाच भांडवल निर्मिती असे म्हणता येईल. भांडवल निर्मितीचा अर्थ समजूण घेण्यासाठी पुढील व्याख्या पाहावी लागेल.

**अ) भांडवल निर्मितीची व्याख्या:** विशिष्ट कालावधीमध्ये अस्तित्त्वात असलेल्या भांडवली साठ्यामध्ये टाकण्यात येणारी शुद्ध भर म्हणजे भांडवल निर्मिती होय. (Net addition made to the existing stock of capital in a given period of time is known as capital formation)

वरिल व्याख्येवरून असे स्पष्ट होते की एका विशिष्ट कालखंडातील देशात उपलब्ध असलेल्या भांडवली साधनात होणारी वाढ ही भांडवल निर्मिती होय. अर्थव्यवस्थेत उत्पादनात वाढ करण्यासाठी उत्पादन साधनांची आवश्यकता असते. उत्पादन साधनात दरवर्षी वाढ करावी लागते म्हणजेच उत्पादन साधनांची निर्मिती करावी लागते या उत्पादन साधनांच्या निर्मितीला भांडवल निर्मिती असे म्हणता येईल.

**आ)भांडवल निर्मितीची वैशिष्ट्ये:** भांडवल निर्मितीचा अर्थ स्पष्ट केल्यानंतर भांडवल निर्मितीची काही वैशिष्ट्ये दिसून येतात. भांडवल निर्मितीची काही प्रमुख वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आपणास स्पष्ट करता येतील.

**१. भांडवल हे मानव निर्मित असते :** भांडवल निर्मितीच्या प्रक्रियेमध्ये अशाच साधनांचा समावेश होतो की जे मानव निर्मित आहेत. निसर्ग निर्मित अशा साधनांचा समावेश भांडवल निर्मितीच्या प्रक्रियेत केला जात नाही. याचाच अर्थ असा की भांडवली वस्तूंचा साठा हा मानवी प्रयत्नांनी वाढविता आला पाहिजे. मानवी श्रमाने निर्मित उत्पादन साधनांना भांडवल असे म्हटले जाते.

**२. वास्तविक भौतिक संपत्तीचा समावेश :** भांडवली वस्तूंची निर्मिती विचारात घेतांना वास्तविक संपत्तीचाच विचार केला जातो. मौद्रिक संपत्तीचा विचार केला जाणार नाही. मौद्रिक संपत्तीमध्ये अंश, पत्रमुद्रा, रोखे इत्यादी अशा संपत्तीचा समावेश होतो. मौद्रिक संपत्तीमध्ये घडून येणारी वाढ म्हणजे भांडवल निर्मिती आहे असे म्हणता येणार नाही तर वास्तवीक अशा भौतिक संपत्तीमध्ये वाढ झाली पाहिजे.

**३. भौतिक वस्तूंची निर्मिती** : भांडवल निर्मिती मध्ये भौतिक वस्तूंची निर्मिती केल्या जाते. भौतिक वस्तू म्हणजेच प्रत्यक्ष डोळ्यांनी दिसणाऱ्या वस्तू होत. भौतिक वस्तूमध्ये यंत्र, उपकरणे, कारखाने इत्यादी वस्तूंचा समावेश होतो. ज्या भौतिक वस्तूंचा वापर उत्पादनाच्या कार्यात केला जातो त्यांना भौतिक साधने असे म्हणतात. भौतिक साधनांची निर्मिती करणे म्हणजे भांडवल निर्मिती होय.

**४. अभौतिक वस्तूंची निर्मिती :** भौतिक वस्तूप्रमाणे अभौतिक वस्तूचा समावेश भांडवल निर्मितीच्या प्रक्रियेत केला जातो. प्रत्यक्ष डोळ्यांनी न दिसणाऱ्या वस्तूंना अभौतिक वस्तू असे म्हणतात. जसे तांत्रिक ज्ञान, कौशल्य, निपुणता, शिक्षण, आरोग्य इत्यादींचा समावेश यामध्ये होत असतो. अशा

अभौतिक वस्तूंच्या साहाय्याने उत्पादन वाढीला चालना मिळत असते. अर्थव्यवस्थेत अशा अभौतिक वस्तूंच्या कमतरतेमुळे विकासाच्या कार्यात अडथळा निर्माण होत असतो.

**५. मानवी भांडवलाचा समावेश :** आर्थिक विकासात मानवी भांडवलाला फार महत्त्व आहे. देशात मानवी भांडवलाचा विकास झाला नाही तर आर्थिक प्रगती साधने शक्य होत नाही. मानवी भांडवलाचा विकास करणे म्हणजे आर्थिक विकासासाठी अत्यंत आवश्यक असणाऱ्या मानवी क्षमतेचा आणि कौशल्याचा विकास करणे होय. मानवी भांडवल निर्मिती मध्ये समाजाने शिक्षणामध्ये केलेली गुंतवणूक, व्यक्तींनी आपल्या वेळेची व पैशाची आपल्या स्वत:च्या विकासासाठी केलेली गुंतवणूक इत्यादींचा समावेश होतो.

**६. स्थिर भांडवल निर्मिती** : उत्पादनाच्या कार्यात वापरल्या जाणाऱ्या भांडवलाचे स्थिर भांडवल आणि चालू भांडवल असे प्रकार पाडले जातात. स्थिर भांडवलामध्ये इमारती, जमिन, यंत्रसामग्री, बंदर बांधणी, विद्युत पुरवठा इत्यादींचा समावेश होतो. स्थिर भांडवलामध्ये वाढ करून उत्पादनात वाढ घडवून आणता येतो म्हणुन स्थिर भांडवलाचा समावेश भांडवल निर्मिती मध्ये केला जातो. स्थिर भांडवलासाठी करावी लागणारी गुंतवणूक दिर्घमुदतीची असते. कारण एकदा स्थिर भांडवलाची निर्मिती केल्यानंतर काही विशिष्ट कालावधीपर्यंत स्थिर भांडवलाची निर्मिती करावी लागत नाही.

**७. चालू भांडवल निर्मिती** : भांडवल निर्मितीच्या प्रक्रियेत चालू भांडवलाचा विचार केला जातो. उत्पादनाच्या कार्यात दररोज वापरली जाणारी साधने यांना चालू भांडवल म्हणता येईल. चालू भांडवलाची महत्त्वाची वैशिष्ट्ये म्हणजे उत्पादन प्रक्रियेत या भांडवलाचा वापर एकदाच करून घेता येतो. दैनंदिन निर्माण होणाऱ्या भांडवलाला चालू भांडवल निर्मिती असे म्हणता येईल. म्हणजेच चालू भांडवलाचा संबंध हा अल्पकाळाशी असतो. चालू भांडवल निर्मिती दररोज करावी लागते.

**८. दिर्घकालीन प्रक्रिया :** भांडवल निर्मिती ही दिर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. भांडवलाचे कार्य सुरळीतपणे व अव्याहतपणे सुरु राहण्यासाठी भांडवल निर्मिती करणे आवश्यक असते कारण उत्पादन कार्यात भांडवलाचा वापर केल्यास भांडवलाची झीज होते. काही विशिष्ट कालावधीनंतर भांडवली साधने निरुपयोगी झाल्यास त्याच्या जागी नविन भांडवलाची व्यवस्था करावी लागते. याचाच अर्थ भांडवली साधनांची निर्मिती दिर्घकाळ चालू ठेवणे आवश्यक असते म्हणून भांडवल निर्मिती ही दिर्घकाळपणे चालू राहणारी प्रक्रिया आहे.

**९. व्यापक संकल्पना** : भांडवल निर्मिती ही स्थूल, व्यापक आणि अर्थव्यवस्थेशी निगडीत असणारी संकल्पना आहे. भांडवल निर्मितीच्या प्रक्रियेचा संबंध संपूर्ण अर्थव्यवस्थेशी जोडला जातो. भांडवल निर्मितीच्या प्रक्रियेत अर्थव्यवस्थेतील सर्व घटकांचा विचार केला जात असल्याने भांडवल निर्मिती ही व्यापक संकल्पना ठरते.

वरीलप्रमाणे भांडवल निर्मितीची वैशिष्ट्ये स्पष्ट केल्यानंतर असे स्पष्ट होते की, भांडवल निर्मिती ही एक प्रक्रिया आहे. तसेच ती अर्थव्यवस्थेत सतत व दिर्घकाळ चालू राहणारी प्रक्रिया आहे. भांडवल निर्मिती ही व्यापक स्वरुपाची संकल्पना आहे.

**३.२.२ भांडवल निर्मितीचे मार्ग (Sources of Capital Formation):** भांडवल निर्मितीच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास केल्यानंतर आपण आता भांडवल निर्मिती कशी होते ते पाहू. अल्पविकसीत देशामध्ये भांडवल निर्मितीला फार महत्त्व आहे. अल्पविकसीत देशातील भांडवल निर्मितीच्या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणींचा विचार केल्यास त्यांनी भांडवल निर्मिती कशी करावी? हा प्रश्न निर्माण होतो. अल्पविकसीत देशात भांडवल निर्मितीची विविध साधने किंवा मार्ग उपलब्ध असतात त्याचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येते.

अ. अंतर्गत मार्ग

ब. बहिर्गत मार्ग

या दोन्ही मार्गाचे विश्लेषण आपणास पुढीलप्रमाणे करता येईल.

**अ. अंतर्गत मार्ग (Internal Sources)**: अल्पविकसीत देशांच्या दृष्टिने विचार केल्यास भांडवल निर्मिती साठी अंतर्गत मार्ग महत्त्वपुर्ण ठरतात. अंतर्गत मार्गामध्ये देशात उपलब्ध असलेल्या विविध घटकांचा वापर करून भांडवल निर्मिती करता येतो. अंतर्गत मार्गात समाविष्ठ असणाऱ्या घटकांचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे करता येईल.

**१. बचत (Saving):** भांडवल निर्मितीच्या अंतर्गत मार्गामध्ये बचतीला सर्वाधीक महत्त्व आहे. ‘आजचा नारा, आणि बचत करा’ असे म्हटले जाते. देशातील बचतीचे ऐच्छिक बचत, सक्तीची बचत आणि सार्वजनिक उपक्रमाची बचत असे प्रकार दिसून येतात. अर्थव्यवस्थेत बचतीचे प्रमाण जास्त राहिल्यास भांडवल निर्मितीचे प्रमाण जास्त राहील.

देशातील लोकांची बचत ही बचत करण्याची इच्छा आणि बचत करण्याची क्षमता या दोन गोष्टीवर अवलंबुन असते. गरीब लोकांची बचत करण्याची इच्छा असते परंतू त्यांची बचत करण्याची क्षमता नसते तर श्रीमंत लोकांची बचत करण्याची क्षमता असते परंतू त्यांची बचत करण्याची इच्छा असेलच असे सांगता येत नाही. कित्येकदा श्रीमंत लोक आपली बचत दाग—दागीने, विलासी वस्तू इत्यादीवर खर्च करीत असतात. भांडवल निर्मितीमध्ये वाढ करण्यासाठी बचत गोळा करणे आवश्यक आहे. देशात बचत कधी स्वेच्छेने गोळा करता येते तर कधी सक्तीने सुद्धा बचत गोळा करता येते.

**२. नफा (Profit) :** अल्पविकसीत देशात भांडवल निर्मितीच्या वाढीसाठी विविध उपाय योजावे लागतात. त्याचाच एक भाग म्हणून नफ्याचा वापर भांडवल निर्मितीसाठी करता येतो. खाजगी क्षेत्रात आणी सार्वजनिक क्षेत्रात प्राप्त होणाऱ्या नफ्याचा वापर भांडवल निर्मितीसाठी करता येतो. खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील उत्पादकांना मिळणाऱ्या नफ्याचे पुर्नगुंतवणूक (Reinvestment) झाली तर भांडवल निर्मितीमध्ये वाढ होण्यास मदत होईल. देशातील उत्पादकांना मिळणाऱ्या नफ्याचा बराच मोठा भाग भागधारकामध्ये लाभांशच्या स्वरुपात वाटला जातो असे न करता त्या नफ्याचा वापर परत उत्पादन कार्यात केल्यास भांडवल निर्मितीमध्ये वाढ होण्यास मदत होईल.

**३. करारोपन :** अल्पविकसीत देशातील लोकांची बचत कमी असते. देशात बचतीचा दर कमी असल्यास भांडवल निर्मितीचा दर कमी राहतो. देशातील सरकार कराच्या माध्यमाने भांडवल निर्मितीत वाढ घडवून आणू शकतो. भांडवल गोळा करण्यासाठी सरकारने कराच्या दरामध्ये थोडी जरी वाढ केली तरी प्रचंड प्रमाणात उत्पन्न गोळा होण्यास मदत होते. अशा उत्पन्नाचा वापर

सरकार हे भांडवल निर्मितीसाठी करू शकतो. सरकारने करविषयक धोरण आखतांना विकासात्मक बाबी विचारात घेवून करधोरण तयार केल्यास भांडवल निर्मितीला चालना मिळण्यास मदत होईल.

**४. सुप्त श्रमशक्तीचा वापर :** अल्पविकसीत देशात सुप्त बेकारीचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणात विद्यमान असते. विशेषत: शेती क्षेत्रामध्ये सुप्त बेकारीचे प्रमाण जास्त असते. शेती क्षेत्रात अतिरिक्त श्रमीक संस्था कार्यरत असते. अशा अतिरिक्त श्रमिकांची सिमान्त उत्पादकता शुन्य असते. अतिरिक्त श्रमिकांना काढून टाकल्यास उत्पादनात काहीच फरक पडत नाही. वास्तविकपणे ते बेकार असतात म्हणुन अशा अतिरिक्त श्रमिकांना सुप्त बेकार असे म्हणतात.

अतिरिक्त श्रमशक्तीचा वापर इतर फायदेशीर उद्योगव्यवसायात केल्या जाऊ शकतो. सुप्त श्रमशक्तीचा अन्य फायदेशीर व्यवसायामध्ये गुंतवणूक केल्यास भांडवल निर्मिती होण्यास मदत होते. प्रो. लुईसच्या मते शेती क्षेत्रातील श्रमिकांची सिमान्त उपयोगीता शुन्य असते. अशा श्रमशक्तीला उत्पादक कार्याकडे वळवुन घेतल्यास आणि त्यांच्याकडून काम करवुन घेतल्यास भांडवल निर्मितीमध्ये वाढ होण्यास मदत होते.

**५. सरकारची भूमिका** : अल्पविकसीत देशाच्या दृष्टीने भांडवल निर्मितीत वाढ करण्यासाठी सरकारची भूमिका अतिशय महत्त्वाची असते. गुंतवणूकीमुळे अर्थव्यवस्थेत भांडवल निर्मितीला चालना मिळत असते. अर्थव्यवस्थेत जेव्हा खाजगी संयोजक गुंतवणूकीसाठी समोर येत नाही तेव्हा सरकारने पुढाकार घेऊन अर्थव्यवस्थेत गुंतवणूक केली पाहिजे. तसेच सरकारने धोरण आखतांना गुंतवणूकीला प्रेरणा मिळेल असे धोरण आखले पाहिजे. अर्थव्यवस्थेत भांडवल संचयात वाढ झाली तर भांडवल निर्मितीमध्ये वाढ होते. भांडवलदार वर्ग भांडवल संचय करू शकतो. सरकारने स्वत:च्या धोरणात बदल करून भांडवलदारांना अधिक नफा प्राप्तीची प्रेरणा निर्माण केल्यास भांडवलदारांच्या भांडवल संचयात वाढ होऊन भांडवल निर्मितीत वाढ होईल.

**६. तुटिचे अर्थप्रबंधन** : भांडवल निर्मितीत वाढ करण्यासाठी सरकारचे तुटिचे अर्थप्रबंधन हा एक प्रभावी उपाय आहे. सरकारच्या उत्पन्न आणि खर्चामध्ये फरक असल्यास तुट निर्माण होते. सरकारच्या उत्पन्नापेक्षा सरकारचा खर्च अधिक असल्यास त्याला तुट असे म्हणतात. सरकारच्या उत्पन्न खर्चातील तुट भरून काढणे म्हणजे तुटीचा अर्थभरणा किंवा तुटिचे अर्थप्रबंधन असे म्हणतात. तुट भरून काढतांना नविन नोटा छापल्या जातात. सरकार नविन नोटा छापुन पैसा उभारतो व विकासात्मक कार्यावर खर्च करतो. अल्पविकसीत देशात तुटिचे अर्थप्रबंधन हे एक असे साधन आहे ज्यामुळे अर्थव्यवस्थेत बचत आणि गुंतवणूकीत वाढ करता येते. बचत आणि गुंतवणूकीत वाढ झाल्यास भांडवल निर्मितीमध्ये वाढ होते.

**७. स्फिती :** स्फिती म्हणजे भाववाढ होय. स्फितीचा परिणाम विकसीत देशात आर्थिक विकासाला अनुकूल ठरला आहे. किंमतीत वाढ झाल्याने उत्पादकांच्या नफ्यात वाढ होते. त्यामुळे त्यांना नविन उत्पादन कार्य करण्यास प्रेरणा मिळते. अर्थव्यवस्थेत उत्साहाचे वातावरण तयार होते. सर्वच क्षेत्रात गतीमानता दिसून येते. नविन उत्पादक औद्योगिकीकरणाकडे आकर्षीत होतात. कृषी व व्यापार क्षेत्रात नफा कमविण्याची संधी प्राप्त होते. लोकांच्या उत्पन्नात वाढ होते. उत्पन्न वाढून बचतीमध्ये वाढ झाल्यास भांडवल निर्मितीचा वेग वाढतो.

**८. साठविलेला पैसा :** अल्पविकसीत देशात गरीबांमुळे लोकांची बचत अत्यंत कमी असते. बचत कमी तर भांडवल निर्मिती कमी असते. अल्पविकसीत देशातील श्रीमंत लोक बचत करू शकतात परंतु त्यांना सोन्याचे फार आकर्षण असते म्हणून त्यांच्याकडील बचतीचा वापर भांडवल निर्मितीसाठी न होता सोने, चांदी, दाग—दागीने, मौल्यवान वस्तू इत्यादी सारख्या वस्तुच्या स्वरुपात साठवुन ठेवली जाते. साठविलेला पैसा बाहेर काढून त्याचा वापर उत्पादन कार्यात झाल्यास भांडवल निर्मिती होण्यास मदत होईल. साठविलेला पैसा बाहेर काढण्यासाठी सरकारने व्याजाच्या दरात वाढ केली तर व्याज प्राप्तीच्या लोभाने बराचसा साठविलेला पैसा बाहेर येतो. बाहेर आलेला पैसा कोणत्या ना कोणत्या तरी क्षेत्रात गुंतवणूक करण्यासाठी वापरला जातो. त्यातुनच भांडवल निर्मितीला चालना मिळतो.

**ब. बहिर्गत मार्ग:** अंतर्गत मार्गाद्वारे भांडवल निर्मिती कशी होते ते आपण पाहिले आहोत. अंतर्गत मार्गाशिवाय देशाबाहेरील मार्गाने सुद्धा भांडवल निर्मिती होते. त्याला बहिर्गत मार्ग असे म्हणता येईल. काही बहिर्गत मार्गाचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करता येईल.

**१. विदेशी मदत :**विकसीत देश अल्पविकसीत देशांना विविध स्वरुपाची भांडवली मदत करीत असतात त्याला विदेशी मदत असे म्हणता येईल. अशा विदेशी मदतीचा वापर अर्थव्यवस्थेतील विविध प्रकल्पामध्ये गुंतवणूक करण्यासाठी केला जात असल्याने भांडवल निर्मितीत वाढ होण्यास मदत होते. विदेशी मदतीमुळे विविध क्षेत्रातील उत्पादन वाढून गुंतवणूक वाढते तसेच विविध क्षेत्रातील लोकांचे उत्पन्न वाढून बचत वाढते त्यामुळे भांडवल निर्मितीत वाढ होण्यास मदत होते.

**२. आयातीवरील बंधने :** देशाच्या आर्थिक विकासाला आवश्यक असणाऱ्या वस्तूंची आयात करण्यासाठी विदेशी चलनाची गरज असते. निर्यातीपेक्षा आयातीचे प्रमाण जास्त असल्यास विदेशी चलनाचा तुटवडा निर्माण होतो अशा परिस्थितीत कोणत्याही देशातील सरकार विविध वस्तूंच्या आयातीवर बंधने घालतो. विशेषत: चैनीच्या वस्तूवर बंधने घातल्यास मोठ्या प्रमाणात विदेशी चलनाची बचत होते. बचत झालेल्या विदेशी चलनाचा वापर विकास कार्यासाठी केल्यास भांडवल निर्मितीला प्रोत्साहन मिळते.

**३. तांत्रिक प्रगती :** आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत तांत्रिक प्रगतीला फार महत्त्व आहे. तांत्रिक प्रगतीमुळे अर्थव्यवस्थेत उत्पादन क्रिया सतत व दिर्घकाळ चालू राहते. अमेरीका, जपान, रशीया, पाश्चिमात्य राष्ट्र या देशांचा विकास तांत्रिक प्रगतीमुळे साध्य झाला आहे. अल्पविकसीत देशात आधुनिक व सुधारीत उत्पादन तंत्राची कमतरता असते. अल्पविकसीत देशांना तांत्रिक प्रगती बाबत नविन शोध लावण्याची गरज नाही तर त्यांनी फक्त परंपरागत व मागासलेल्या उत्पादन तंत्राचा त्याग करून आधूनिक तांत्रिक प्रगतीचा वापर केला पाहिजे. त्यामुळे आर्थिक विकासाचा वेग वाढून भांडवल निर्मितीच्या प्रक्रियेला चालना मिळण्यास मदत होते.

वरीलप्रमाणे अल्पविकसीत देशात अंतर्गत मार्ग आणि बाह्यमार्ग अशा दोन्ही मार्गाचा वापर करून भांडवल निर्मिती करता येते. भांडवल निर्मितीच्या अभावी देशाचा आर्थिक विकास साधला जात नाही म्हणुनच भांडवल निर्मिती आर्थिक विकासाची गुरुकिल्ली आहे असे म्हटले जाते.

**३.२.३ भांडवल निर्मितीचा दर अल्प असण्याची कारणे:** नविन भांडवली साधने दरवर्षी ज्या दराने निर्माण होतात त्यालाच भांडवल निर्मितीचा दर असे म्हणता येईल. अल्पविकसीत देशात भांडवल

निर्मितीचा दर कमी असतो तर विकसीत देशात तो जास्त असतो. साधारणत: अल्पविकसीत देशात भांडवल निर्मितीचा दर हा १० ते १५ टक्के एवढा असतो तर हाच दर विकसीत देशात २५ ते ३० टक्के एवढा असतो. अल्पविकसीत देशात भांडवल निर्मितीचा दर कमी का असतो याची कारणे सांगावयाची झाल्यास आपणास ती पुढील प्रमाणे सांगता येतील.

**१. दरडोई उत्पन्न कमी :** अल्पविकसीत देशाच्या अर्थव्यवस्थेत विविध क्षेत्राचा विकास झालेला नसतो. जसे कृषी क्षेत्र, उद्योग क्षेत्र इत्यादी क्षेत्र मागासलेली असतात. त्यामुळे उत्पादनाचे प्रमाण कमी असते. राष्ट्रीय उत्पन्न कमी असते. लोकसंख्येच्या मानाने राष्ट्रीय उत्पन्न कमी असल्याने दरडोई उत्पन्न कमी राहते. दरडोई उत्पन्नाचे प्रमाण कमी म्हणुन लोकांची बचत सुद्धा कमी राहते. लोकांचे उत्पन्न जास्त तर लोकांची बचत जास्त राहील. परंतु अल्पविकसीत देशात या विरुद्ध परिस्थिती असते. बचतीच्या प्रमाणावर किंवा बचतीच्या दरावर भांडवल निर्मितीचा दर अवलंबुन असतो. बचतीचा दर कमी तर भांडवल निर्मितीचा दर कमी रहातो. अल्पविकसीत देशातील लोकांचे उत्पन्न एवढे कमी असते की त्यांच्या दैनंदिन गरजा सुद्धा पूर्ण होऊ शकत नाही. ज्यामुळे ते बचत करू शकत नाही. त्याचा परिणाम भांडवल निर्मितीवर होऊन भांडवल निर्मितीचा दर कमी राहतो.

**२. वाढती लोकसंख्या** : अल्पविकसीत देशात आर्थिक विकासासाठी आवश्यक असणाऱ्या लोकसंख्या पेक्षा अतिरीक्त लोकसंख्या अस्तित्वात असते. लोकसंख्या वाढीचा दर विकसीत देशाच्या मानाने खुप जास्त असतो. वाढत्या लोकसंख्येला रोजगार पुरवठा करणे आवश्यक असते. परंतु अल्पविकसीत देशात आर्थिक विकासाच्या अभावी वाढत्या लोकसंख्येला रोजगार पुरवठा करणे शक्य होत नाही. बेकारीच्या प्रमाणात वाढ होत असते. श्रमिकांचा पुरवठा जास्त असल्याने वेतनाचा दर कमी असतो. वेतनाचा दर कमी म्हणुन लोकांचे उत्पन्न सुद्धा कमी राहते. उत्पन्न कमी म्हणून बचत कमी आणि पर्यायाने भांडवल निर्मितीचा दर कमी राहतो. अर्थव्यवस्थेत लोकसंख्येचे प्रमाण जास्त असल्यास अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होतात. लोकांच्या समस्या मिटविण्यातच सरकारचा वेळ आणि पैसा जातो. त्यामुळे सरकारला कोणतेही उत्पादकीय स्वरुपाचे कार्य हाती घेता येत नाही. याचा परिणामं भांडवल निर्मितीवर होऊन भांडवल निर्मितीचा दर कमी राहतो.

**३. बाजारपेठांचा लहान आकार :** अल्पविकसीत देशात बाजारपेठांचा विकास व विस्तार झालेला नसतो. कारण लोकांचे उत्पन्न अत्यंत कमी असल्याने त्यांची क्रय शक्ती कमी असते. क्रयशक्तीच्या अभावी विविध वस्तूंचा उपयोग कमी असतो. अर्थव्यवस्थेत उपभोगाची पातळी कमी राहते. उपभोग्य वस्तूंची मागणी कमी असते. तसेच अल्पविकसीत देशातील बहुसंख्य लोक ग्रामीण भागात राहतात. ग्रामीण लोकांच्या गरजा अत्यंत कमी असतात. इत्यादी कारणामुळे बाजारपेठांचा विकास व विस्तार होत नाही. गुंतवणूकीला प्रेरणा मिळत नाही. नव्याने गुंतवणूक केली जात नाही. गुंतवणूकीचे प्रमाण कमी म्हणून भांडवल निर्मितीचे प्रमाण सुद्धा कमी राहते.

**४. अल्प उत्पादकता :** परंपरागत उत्पादनाचे तंत्र, अकुशल व अकार्यक्षम श्रमिक इत्यादी कारणामुळे अल्पविकसीत देशात उत्पादकता कमी असते. उत्पादकता म्हणजे उत्पादन करण्याची क्षमता होय. अल्प उत्पादकतेमुळे देशात उपलब्ध असलेल्या साधन सामुग्रीचा योग्य व पर्याप्त वापर होत नाही. उत्पादन वाढीला चालना मिळत नाही. याचा परिणाम राष्ट्रीय उत्पादन, राष्ट्रीय

उत्पन्न, बचतीचे प्रमाण, भांडवल निर्मिती इत्यादींवर होत असतो. उत्पादनाचे प्रमाण कमी राहत असल्याने भांडवली साधनांची गुंतवणुक कमी असते. म्हणुन भांडवल निर्मितीचा दर कमी असतो.

**५. मौल्यवान व पिवळ्या धातुचे आकर्षण** : भांडवल निर्मितीमध्ये वाढ करण्यासाठी बचतीमध्ये वाढ करावी लागते. अल्पविकसीत देशात गरीब वर्गाकडून बचत होत नाही जी काही बचत होते ती श्रीमंत वर्गाकडून होते. परंतु श्रीमंत लोक बचतीचा वापर आपल्या प्रतिष्ठेसाठी सोने, चांदी, हिरे, मोती, माणके इत्यादी मौल्यवान वस्तूच्या खरेदीसाठी करीत असतात. त्यांची बचत भांडवल निर्मितीमध्ये परावर्तीत होत नाही. याचा परिणाम भांडवल निर्मितीवर होऊन भांडवल निर्मितीचा दर कमी असतो.

**६. बँक सवयींचा अभाव :** देशातील बँका ह्या लोकांची बचत गोळा करण्याचे महत्त्वपुर्ण काम करीत असतात. विकसीत देशात बँक व्यवसायाचा विकास व विस्तार झालेला असल्याने मोठ्या प्रमाणात बचत गोळा होऊन ती विविध क्षेत्रात भांडवल निर्मितीच्या कार्यात वापरली जाते. अल्पविकसीत देशात मात्र बँकांचा विकास व विस्तार झालेला नसतो. लोकांना बँक विषयक सेवेचे ज्ञान नसते. लोकांचे बहुसंख्य व्यवहार बँकेशी होत नाहीत. याचा परिणाम म्हणुन लोकांची बचत गोळा होत नाही. बँका मार्फत बचत गोळा झाल्यास ती कर्जाच्या स्वरुपात भांडवल निर्मितीसाठी पुरवठा होत असते. त्यातूनच भांडवल निर्मितीत वाढ करण्यास मदत होते.

**७. औद्योगिक मागासलेपणा** : अल्पविकसीत देशात उद्योग क्षेत्राचा विकास झालेला नसतो. औद्योगिक प्रगती झाली नसल्याने विविध उद्योगांची स्थापना झालेली नसते. भांडवली साधनांचा वापर उद्योग क्षेत्रामध्ये अत्यंत कमी प्रमाणात होत असतो. अल्पविकसीत देशाची अर्थव्यवस्था कृषीप्रधान असते. परंतु कृषी क्षेत्रात गुंतवणूकीच्या संधी निर्माण होत नसल्याने भांडवली साधनांची गुंतवणूक मोठ्या प्रमाणात होत नाही. म्हणुन भांडवल निर्मितीचा दर हा अत्यंत कमी राहतो.

वरीलप्रमाणे अनेक कारणामुळे अल्पविकसीत देशात भांडवल निर्मितीचा दर कमी असतो अल्पविकसीत अर्थव्यवस्थेत अनेक अडचणी आणि समस्या असतात त्याचा परिणाम म्हणून भांडवल निर्मितीचा दर कमी असतो.

**आपली प्रगती तपासा—१ अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. भांडवल निर्मितीच्या साहाय्याने काय तोडता येते?
२. नैसर्गिक साधनांचा समावेश कशामध्ये होत नाही?
३. शेती क्षेत्रात कांही श्रमिकांची सीमान्त उपयोगिता किती समजली जाते?
४. स्फिती म्हणजे काय?
५. अल्पविकसीत देशात लोकसंख्येचे प्रमाण किती असते?

## ३.३ किंमत धोरण (Price Policy)

विद्यार्थी मित्रांनो, अर्थव्यवस्था कुठल्याही प्रकारची असो विकसीत असो किंवा अवकसित असो. किंमतीस महत्त्वाची भूमिका पार पाडावयाची असते. देशाचा जसजसा विकास घडून येतो. तसतसे किंमतीमध्ये वाढ होणे अगदी स्वाभाविक असते. अल्पविकसीत देशात नियोजन प्रक्रियेला वेग आल्यानंतर किंमती वेगाने वाढू लागतात जेव्हा ही वाढ देशातील गुंतवणूक आणि राष्ट्रिय उत्पन्नातील वाढीपेक्षा जास्त असते तेंव्हा किंमती विषयक समस्या निर्माण होतात. त्यामुळे किंमतीचे महत्त्वाचे कार्य म्हणजे अर्थव्यवस्थेत मागणी व पुरवठ्यामध्ये संतूलन निर्माण करणे होय. आर्थिक

नियोजनाचा वापर करणाऱ्या देशात विविध विकास योजनांवरील खर्चामूळे लोकांच्या हातात पैसा येऊन त्यांची मागणी वाढते. मागणी वाढल्याने किंमती वाढू लागतात. किंमती वाढल्याने पुरवठ्यातही वाढ होते परंतू किंमतीतील वाढीपेक्षा पुरवठ्यात होणारी वाढ कमी असते.

आर्थिक नियोजनाचा प्रयोग करणाऱ्या भारतासारख्या मिश्र अर्थव्यवस्थेमध्ये (Mixed Economy) सार्वजनिक क्षेत्र आणि खाजगी क्षेत्र तसचे स्वतंत्र बाजार यंत्रणा आणि नियंत्रित बाजार यंत्रणा अस्तीत्त्वात असते. अशा अर्थव्यवस्थेत बाजार यंत्रणाशी संबंधीत असलेले घटक आपआपल्या परिणे किंमतींना प्रमाणित करीत असतात. किंमतीच्या वाढत्या प्रवृत्तीला नियंत्रीत करणे हे किंमत धोरणाचे मुख्य कार्य आहे. किंमतीतील चढ–उताराचा अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रामध्ये केल्या जाणाऱ्या संसाधनांच्या वाटपावर महत्त्वपुर्ण परिणाम होत असतो. म्हणुन किंमतीचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते.

**३.३.१ किंमत धोरणाची उद्दिष्टे:** देशाचा जलद आर्थिक विकास होण्यासाठी योग्य किंमत धोरण सरकारने राबविणे आवश्यक ठरते. योग्य किंमत धोरण राबविण्यास देशाचे संतूलीत व जलद विकासाचे उद्दिष्टे साध्य होते. यासाठी किंमत धोरणाची उद्दिष्टे आपणास पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१. मागणी व पुरवठ्यात संतूलन साधने** : आर्थिक नियोजनाचा अवलंब करणाऱ्या देशात सुरवातीला सरकारला मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. सरकारी खर्चामुळे लोकांच्या हातात पैसा येतो. लोकांच्या मागणीत वाढ होते. मागणीत वाढ झाल्यामुळे पुरवठ्यातही वाढ होणे आवश्यक असते. परंतु मागणीत ज्या प्रमाणात वाढ होते त्या प्रमाणात पुरवठ्यात वाढ होत नाही म्हणून अर्थव्यवस्थेत मागणी व पुरवठ्यात असमानता निर्माण होते.

पुरवठ्यापेक्षा मागणी जास्त असल्यास किंमतीमध्ये वाढ होत असते. नियोजीत अर्थव्यवस्थेमध्ये किंमती धोरण आखतांना असे असले पाहिजे की जेणेकरून वस्तूच्या मागणी–पुरवठ्यात संतूलन साधल्या जाईल. म्हणजेच किंमत धोरण आखतांना विविध वस्तूंच्या किंमती वाढणार नाही असे धोरण ठरविणे आवश्यक आहे.

**२. किंमतीमध्ये लवचिकता आणने :** अल्पविकसीत देशात गुंतवणुकीनंतर लगेच उत्पादनात वाढ होत नाही. त्यासाठी बराच कालावधी लागतो. परंतु गुंतवणूकीमूळे लोकांना रोजगार मिळून त्यांचे उत्पन्न वाढते व मागणीत वाढ होते. मागणी जास्त व पुरवठा कमी अशी परिस्थिती निर्माण होते तेव्हा किंमत पातळी वाढू लागते आशा परिस्थितीत होणारी किंमत वाढ सामाजिक दृष्ट्या योग्य राहील परंतु जर किंमतपातळी वाढून उत्पादनात वाढ होत नसेल, मागणीत घट होत असेल तर अशी किंमत वाढ सामाजिकदृष्ट्या अपायकारक ठरते. म्हणुन किंमत धोरण आखतांना किंमतीमध्ये लवचिकता राहील असे किंमत धोरण अखले पाहिजे. अर्थव्यवस्थेत किंमतपातळी सतत वाढणारी नसावी आणि किंमतपातळी सतत कमी होणारी सुद्धा नसावी.

**३. उपभोग्य वस्तूंच्या किंमतीत स्थिरता राखणे** : उपभोग्य वस्तू म्हणजे ज्या वस्तूंचा प्रत्यक्ष वापर होतो अशा वस्तू होय. उपभोग्य वस्तूंच्या किंमतीत सतत वाढ होत असेल तर देशातील श्रमिक वर्ग, गरीब वर्ग यांचे फार हाल होत असतात. अशा वर्गातील लोकांची उपभोगाची पातळी घटत जाते. त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊनही किंमत वाढीमुळे त्यांच्या उपभोगात वाढ होत नाही म्हणून

सरकारने किंमत धोरण ठरवितांना उपभोग्य वस्तुंच्या किंमती स्थिर राहतील असे उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून किंमत धोरण आखणे आवश्यक असते.

**४. कृषीमाल किंमत निश्चिती :** अल्पविकसीत देश प्रामुख्याने कृषीप्रधान देश म्हणून ओळखल्या जातात कारण त्या देशातील बहुसंख्य लोकसंख्या रोजगारासाठी कृषीक्षेत्रावर अवलंबुन असते. राष्ट्रीय उत्पन्नातील सुमारे निम्मा हिस्सा हा कृषी क्षेत्राचा असतो. त्यामुळे अल्पविकसीत देशाच्या विकासाच्या दृष्टिने कृषीमालाचे किंमत धोरण योग्य असावे लागते. कृषीमाल किंमत धोरण निश्चित करताना कृषीमालाच्या किमान व कमाल किंमती निश्चित करणे आवश्यक असते. त्यानंतर या मर्यादेबाहेर कृषीमालाच्या किंमती जाणार नाहीत याची दक्षता सरकारने घेणे आवश्यक असते.

**५. निर्यात वस्तूबाबत किंमत धोरण** : कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापाराला फार महत्त्व असते. आंतरराष्ट्रीय व्यापाराला आर्थिक विकासाचे इंजीन असे म्हटले जाते. आयातमूल्य आणि निर्यातमूल्य या वरून देशाचा आर्थिक विकास प्रस्थापित होत असतो. अल्पविकसीत देशात नेहमी निर्यात मूल्यापेक्षा आयातीचे मूल्य जास्त असल्याचे दिसून येते. आयात मूल्य नेहमी जास्त राहील्यास विदेशी चलनाची समस्या निर्माण होते. म्हणुन निर्यात वस्तुबाबत किंमत धोरण तयार करणे हे किंमत धोरणाचे महत्त्वाचे उद्दिष्टे आहे.

देशातील विलासी व चैनीच्या वस्तूवरील कराचे दर वाढवुन त्यांचे उत्पादन कमी करणे आवश्यक असते. अशा वस्तुचे उत्पादन कमी झाल्यास काही उत्पादन साधने मुक्त होऊन ती साधने निर्यात वस्तू उद्योगाकडे वळती करणे आवश्यक असते. यामुळे निर्यात वस्तूचे उत्पादन वाढून निर्यातीच्या मूल्यामध्ये वाढ करता येईल. त्याचप्रमाणे निर्यात योग्य वस्तूंचा देशांतर्गत उपयोग जास्त घेतला जात असेल तर त्यावर कर आकारून उपभोग नियंत्रित करणे आवश्यक असते. अशा प्रकारे निर्यात वस्तूबाबत किंमत धोरण असणे हे एक किंमत धोरणाचे महत्त्वाचे उद्दिष्टे आहे.

**६. वेतन धोरण निश्चिती** : किंमतपातळी आणि वेतन दर यांचा अगदी जवळचा संबंध असतो. देशात किंमत पातळीत वाढ झाल्यास वेतन दरात वाढ करावी लागते. कारण वस्तुंच्या किंमती वाढल्या तर श्रमिक वर्ग वेतनात वाढ करण्याची मागणीउचलून धरीत असतो. वेतनात वाढ केली तर त्याचा परिणाम उत्पादन खर्च वाढण्यावर होतो. कारण वेतन हे उत्पादन खर्चामध्ये समाविष्ठ असते. उत्पादन खर्च वाढला म्हणून परत वस्तूंच्या किंमती वाढविल्या जातात तेव्हा किंमत वाढ → वेतन वाढ → किंमत वाढ असे चक्र अर्थव्यवस्थेत निर्माण होते. यावर उपाय म्हणून वेतन गोठविणे (Wage Freeze) असा उपाय सुचविण्यात येतो परंतु हा उपाय योग्य ठरत नाही. म्हणून वेतन धोरण हे उत्पादकतेवर अवलंबुन असावे लागते त्यासाठी योग्य असे धोरण आखणे हे किंमत धोरणाचे उद्दिष्टे आहे.

वरील उद्दिष्टाशिवाय किंमत धोरणाची इतर काही उद्दिष्टे सांगता येतील जसे राष्ट्रिय उत्पादनात वाढ करणे, बेकारीचे प्रमाण कमी करणे, समतोल विकास साधने, आर्थिक विषमता कमी करणे, लोकांच्या राहणीमानात सुधारणा करणे इत्यादी किंमत धोरणाची उद्दिष्टे सांगता येतील.

**३.३.२ किंमत धोरणाची साधने :** किंमत धोरणांच्या उद्दिष्टांचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की अर्थव्यवस्थेत किंमत धोरणाला फार महत्त्व आहे. कोणत्याही सरकारला किंमत धोरण आखणे आणि त्याची परिणामकारक अंमलबजावणी करणे आवश्यक असते. किंमत धोरणाची विविध

उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवुन कार्यवाही परिणामकारक रितीने करण्यासाठी किंमत धोरणाच्या काही विशिष्ट साधनांचा वापर करावा लागतो ती साधने पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१. किंमत नियमन आणि नियंत्रण :** आर्थिक नियोजनाचा स्विकार करणाऱ्या देशात किंमत नियमन आणि नियंत्रणाला फार महत्त्व असते. अल्पविकसीत देशात सर्वच वस्तूंची तिव्र टंचाई जाणवत असते. अशा परिस्थितीत किंमत यंत्रणा मुक्तपणे कार्य करू लागतात त्याचा विपरीत परिणाम सामाजिक कल्याणावर होतो कारण साठेबाजीचे प्रमाण वाढणार, नफ्याचे प्रमाण वाढणार, नफा प्राप्त करणाऱ्या वस्तुचे उत्पादन केल्या जाणार, मक्तेदारी निर्माण होणार. अशा अर्थव्यवस्थेत किंमतीवर नियंत्रण लादणे आणि किंमतीचे नियमन करणे आवश्यक असते. किंमत नियमन व नियंत्रण पद्धतीचा वापर सरकारने केल्यास सरकारने ठरवुन दिलेल्या किंततीपेक्षा अधिक किंमत उत्पादकांना व विक्रेत्यांना आकारता येणार नाही. अर्थव्यवस्थेत किंमत यंत्रणेचे कार्य व्यवस्थीतपणे चालू राहील.

**२. दुहेरी किंमत (Dual Pricing)** : कल्याणकारी राज्यातील गरिब लोकांच्या किमान मुलभूत गरजा भागविणे हे सरकारचे महत्त्वाचे कार्य असते. सरकारने अन्नधान्य, कापड, केरोसीन इत्यादी सारख्या जिवनावश्यक वस्तुंच्या विक्रीला अर्थसाहाय्य केले पाहिजे. समाजातील गरीब लोकांना अल्प किंमतीला वस्तू उपलब्ध करणे हे सरकारचे कार्य आहे. सरकारतर्फे अर्थसाहाय्य दिल्या जात असताना व वस्तूची विक्री केली जात असताना त्याचे ओझे त्या वस्तूंच्या उत्पादकावर पडणार नाही याची व्यवस्था सरकारला करावी लागते. या संदर्भात दुहेरी किंमत पद्धती हे साधन उपयूक्त ठरते. दुहेरी किंमत पद्धतीमध्ये एकाच वस्तुची किंमत बाजारपेठेत दोन प्रकारे ठरलेली असते. याचाच अर्थ एकाच वस्तूची किंमत सरकार गरीबांसाठी कमी ठेवतो तर इतरांसाठी जास्त ठेवतो.

**३. राज्यव्यापार (State Trading) आणि शिल्लकी साठा (Buffer Stock)** : किंमत वाढीच्या विरूद्ध धोरण आखत असताना सरकारला कृषीमाल किंमत धोरणाला महत्त्व देणे आवश्यक आहे. शेतमालाच्या किंमती कोणत्या पातळीवर निश्चित केल्या जाव्यात हा प्रश्न कृषीमाल उत्पादकांच्या व उपभोक्त्यांच्या दृष्टिने अतिशय जिव्हाळ्याचा असतो. कृषीमालाच्या किंमतीमधून कृषीमालाचा सर्व प्रकारचा उत्पादन खर्च भरून निघाला पाहिजे तसेच समाजातील दुर्बल घटकांच्या हिताचे रक्षण झाले पाहिजे. यासाठी राज्य व्यापार हे साधन वापरले गेल्यास आणि धान्यखरेदी योजना हाती घेतल्यास शेतमालाच्या किंमतीमध्ये स्थिरता निर्माण होईल.

**४. मौद्रिक धोरण (Monetary Policy)** : किंमत धोरणाची योग्य कार्यवाही होण्यासठी मौद्रिक धोरण अतिशय महत्त्वाची भूमिका बजावित असते. अर्थव्यवस्थेत पैशाच्या पुरवठ्यात वाढ झाली तर त्याचा परिणाम किंमत वाढीवर होतो. मौद्रिक धोरणाचा वापर करून पैशाचा पुरवठा नियंत्रीत करता येतो आणि किंमतपातळीत आवश्यक बदल करता येतो. मौद्रिक धोरणाच्या साहाय्याने अर्थव्यवस्थेतील विशिष्ट क्षेत्राकडे पैसा वळविता येतो. तसेच काही क्षेत्राकडे पतपैशाचा ओघ वळण्यास प्रतिबंध लावता येतो. त्यामूळे किंमत धोरणाची अंमलबजावणी परिणामकारकरित्या होण्यास मदत होते.

**५. राज्य वित्तिय धोरण** : किंमत धोरणाच्या यशस्वितेसाठी जसे मौद्रिक धोरण महत्त्वपूर्ण ठरते तसेच वित्तिय धोरण देखील महत्त्वपुर्ण ठरते. वित्तिय धोरणामध्ये कर आकारणी आणि सार्वजनिक खर्च या संबंधीचे धोरण तयार केले जाते म्हणजेच सार्वजनीक उत्पन्न व सार्वजनिक खर्च या

विषयीचे धोरण तयार केले जाते. किंमतपातळीत वाढ होत असतांना समाजातील विशिष्ट वर्गातील लोकांवर कर आकारू किंवा कराच्या दरात वाढ करून लोकांची खरेदी शक्ती कमी करता येतो. त्यामुळे मागणी कमी होऊन किंमतपातळीत घट होते. तसेच सार्वजनिक खर्चात वाढ किंवा घट केल्यास त्याचा परिणाम समाजातील लोकांच्या खरेदी शक्तीवर होतो. सार्वजनिक खर्चात वाढ केल्यास लोकांची खरेदी शक्ती वाढते व मागणी वाढते या उलट सार्वजनिक खर्चात घट केल्यास लोकांची खरेदी शक्ती कमी होईल. अशा प्रकारे राज्य वित्तीय धोरणाद्वारे किंमत पातळीवर अपेक्षीत नियंत्रण ठरता येतो व किंमत धोरणाची अंमलबजावणी करता येते.

**आपली प्रगती तपासा—२**

**ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१. किंमतीच्या वाढत्या प्रवृत्तीला नियंत्रीत करणे हे ........ मुख्य कार्य आहे.
२. वेतन हे ........ मध्ये समाविष्ट केले जात असते.
३. किंमतीचे महत्त्वाचे कार्य म्हणजे मागणी व पुरवठ्यात .......... निर्माण करणे होय.
४. अल्पविकसीत देशात गुंतवणुकीत वाढ केल्यांनतर ...................... मध्ये लगेच वाढ होते नाही.
५. अल्पविकसित देशात नेहमी निर्यातीपेक्षा आयातीचे मूल्य ................ असते.

## ३.४ आर्थिक विकासात राज्याची भूमिका (Role of State in Economic Development)

राज्य म्हटले की, सार्वजनिक सत्ता किंवा सरकार असे म्हटले जाते. आज राज्याचे प्रतिनिधीक स्वरुप म्हणजे दुसरे तिसरे काही नसून सरकार होय. राज्याचा सार्वजनिक विकास साधने हे सरकारचे पहिले कर्तव्य ठरते. आपल्या राज्याला सुखी आणि सुमृद्ध बनविने ही सरकारची जबाबदारी असते. अल्पविकसीत देशामध्ये भांडवलाचा अभाव, निकृष्ठ दर्जाचे यांत्रिकीकरण व तांत्रिक ज्ञान, अकुशल श्रमिक, कुशल संघटकाचा अभाव, साधनांची अगतिशीलता, बाजारपेठांचा लहान आकार, दारिद्र्याचे दृष्टचक्र इत्यादी अनेक प्रश्न आर्थिक विकासाच्या मार्गात अडथळा निर्माण करतात. अशा परिस्थितीत खाजगी क्षेत्राद्वारे या समस्यांचे निराकरण करणे शक्य नसेत म्हणून सरकारची भूमिका आर्थिक विकासाच्या दृष्टिने महत्त्वपुर्ण ठरते. त्यासाठी सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार करण्याबरोबरच खाजगी क्षेत्राला उत्तेजन देणे अशी दुहेरी भूमिका सरकारला पार पाडावी लागते.

जगातील जे देश आज विकसीत आहेत त्या देशातील सरकारने सर्वप्रथम आधारभूत उद्योगाची स्थापना केली. त्यामूळे विकासाची प्रक्रिया गतिमान झाली. जगात असा एकही देश नसेल जेथे आर्थिक विकासात सरकारचा हस्तक्षेप नाही. सरकारला आर्थिक विकासात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष स्वरुपाची कामे पार पाडावी लागतात. सरकारच्या अशा अनेक कार्यापैकी संस्थात्मक बदल आणि संघटनात्मक बदल अशा दोन महत्त्वपुर्ण कार्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेतलेला आहे.

**३.४.१ संस्थात्मक बदल (Institutional Change)** देशाच्या आर्थिक विकासात आर्थिक संस्था आणि आर्थिकेत्तर संस्था यांना फार महत्त्व असते. सामाजिक, आर्थिक, राजकिय आणि धार्मिक अशा सस्थांचा आर्थिक विकासाशी अतिशय घनिष्ठ स्वरुपाचा संबंध असतो. कारण या संस्थामध्ये बदल झाल्याशिवाय देशात आर्थिक विकासाला अनुकूल असे वातावरण तयार होत नाही. अल्पविकसीत देशात अशा संस्था विकास कार्यात अडथळा निर्माण करीत असतात.

संस्था म्हणजे काय? ते पहावयाचे झाल्यास असे म्हणता येईल संस्था म्हणजे सामाजीक परंपरेच्या समुहाची अभिव्यक्ती होय. संस्था ही स्थायी स्वरुपाची असते आणि मानव त्याप्रमाणे कार्य करीत असतो. संस्था नेहमी परिवर्तनशील असतात.

व्याख्या : प्रो. बोगार्डसच्या मते, "एक सामाजिक संस्था समाजाची अशी रचना असते की जी निर्धारीत पद्धतीने लोकांच्या गरजा भागविण्यासाठी संघटीत केली जाते."

वरील व्याखेचा अभ्यास केल्यास संस्था या संकल्पनेची काही वैशिष्ट्ये सांगता येतील ती पुढीलप्रमाणे

**संस्थाची वैशिष्ट्ये**

१. प्रत्येक संस्था विशिष्ठ एका उद्देशासाठी निर्माण झालेली असतात.
२. संस्थांना समाज मान्यता प्राप्त झालेली असते.
३. प्रत्येक संस्थाना निश्चित रुप देण्यासाठी आणि कार्यवाहीसाठी नियम किंवा उपनियम ठरविल्या जातात.
४. प्रत्येक संस्थांची निर्मिती आणि विकास एखाद्या संकल्पनेमधून होत असतो.
५. चांगल्या उद्देशासाठी निर्माण झालेली संस्था समाजाचा लाभ वाढविण्याकरिता कार्य करते.

वरीलप्रमाणे वैशिष्ट्ये पाहिल्यानंतर संस्था म्हणजे काय ते लक्षात येईल. आर्थिक विकासाची प्रक्रिया गतिमान करण्यासाठी आर्थिक व आर्थिकेत्तर संस्थामध्ये बदल होणे अभिप्रेत असते. संस्थात्मक बदल पुढीलप्रमाणे आपणास स्पष्ट करता येतील.

**१. लोकांची अनुकूल प्रवृत्ती :** देशाचा विकास हा लोकांच्या मनोवृत्तीवर अवलंबुन असतो. लोकांच्या मनोवृत्तीमध्ये बदल होणे आवश्यक आहे. लोकांचा विचार बदलला तर ज्ञान व कौशल्य संपादन करण्याचा व उत्पादनात वाढ करण्याचा निर्णय घेऊन हा निर्णय अंमलातही आणतो. आपल्या आर्थिक परिस्थितीमध्ये बदल झाला पाहिजे, आपल्या उत्पन्नात वाढ झाली पाहिजे. आपल्या जिवणमानात सुधारणा झाली पाहिजे असे लोकांना जोपर्यंत वाटणार नाही तोपर्यंत लोक अधिक कष्ट, अधिक परिश्रम करण्यासाठी प्रवृत्त होणार नाहीत. लोकांची दैववादी प्रवृत्ती, वर्तमानकाळाबद्दल लोकांची अनास्था, कामावर उशिरा येण्याची प्रवृत्ती, कामाची टाळाटाळ आणि कामावर गैरहजर राहण्याची प्रवृत्ती अशा विविध कारणांचा परिणाम आर्थिक विकासावर होऊन देशाची आर्थिक प्रगती साधली जात नाही म्हणुन लोकांची प्रवृत्ती विकासाला अनुकूल असली पाहिजे.

**२. धार्मिक प्रभाव** : अल्पविकसीत देशांत धार्मिक प्रभावामुळे लोकांचे विचार, त्यांची वागणुक, त्यांचे इतरांशी असलेले संबंध अशा सर्व गोष्टी प्रभावीत होत असतात. अल्पविकसीत देशातील बहुसंख्य लोक किंवा सर्व लोक हे धार्मिक प्रवृत्तीला मानणारे असतात. धर्माच्या अज्ञेचे पालन करणारे आणि धार्मिक तत्त्वे मूल्य म्हणुन जोपासणारे असतात. याचा परिणाम आर्थिक विकासावर होतो व आर्थिक विकास खुंटतो म्हणुन लोकांचा धर्माच्या प्रती असलेला दृष्टिकोण बदलला पाहिजे. धार्मिक संस्थाच्या प्रभावामुळे लोकांमध्ये आळस, निष्क्रीयता, दैववादी प्रवृत्ती, अध्यात्मवादाचे महत्त्व, धार्मिक व सामाजिक कार्यावर अवास्तव खर्च इत्यादी प्रवृत्ती निर्माण होतात. अशा प्रवृत्तीमध्ये वाढ होत असेल तर आर्थिक विकासाच्या कार्यात अडथळे निर्माण होतात म्हणुन धार्मिक प्रवृत्तीत बदल होणे आवश्यक आहे.

**३. जाती व्यवस्था :** देशात जातीव्यवस्था प्रबळ असेल तर जातीव्यवस्थेमुळे श्रमिकांची गतिक्षमता कमी होते. जातीनुसार व्यवसायाची निवड करावी लागते. श्रमिकाला आपल्या आवडी–निवडीनुसार व आपल्या कार्यक्षमतेनुसार व्यवसायाची निवड करता येत नाही. याचा परिणाम देशाच्या विकासावर होतो कारण जातीव्यवस्थेमुळे देशातील श्रमिकांची उत्पादकता कमी राहते. म्हणुन जातीव्यवस्थेत बदल होणे अत्यंत आवश्यक आहे. किंग्जले डेव्हिस या सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञाच्या मते जातीव्यवस्थेच्या परिणामामुळे समाजातील संबंधामध्ये अत्याधिक तणाव उत्पन्न झाला आहे. जात हे सामाजिक व आर्थिक पिळवणुकीचे साधन बनले आहे.

**४. संयुक्त कुटुंब पद्धती :** अल्पविकसीत देशात बहुसंख्य लोकसंख्या संयुक्त कुटुंब पद्धतीचे जिवन जगत असतात. या पद्धतीमध्ये कुटुंब प्रमुखाला महत्त्वाचे स्थान असते. संपूर्ण कुटुंबावर, कुटुंबाच्या व्यवसायावर तसेच आर्थिक व सामाजिक व्यवहारावर कुटुंब प्रमुखाचे नियंत्रण असते.

संयुक्त कुटुंब पद्धती ही एक सामाजिक संस्था आहे. या संस्थेचा परिणाम असा होतो की एकाने कमवावे आणि बाकीच्चाने बसून खावे अशी प्रवृत्ती निर्माण होते यामुळे प्रत्येकाने काम केलेच पाहिजे हा दृष्टिकाणे नाहीसा होतो. कुटुंबातील इतर व्यक्तींची काम करण्याची प्रेरणा नाहिसी होते त्याचा विपरीत परिणाम उत्पादन पातळीवर होऊन राष्ट्रिय उत्पादन वाढण्यास मदत होत नाही परिणामी आर्थिक विकास घडून येत नाही म्हणुन अशा संस्थात बदल होणे अत्यंत आवश्यक आहे.

**५. वारसा हक्क :** वारसा हक्क या संस्थामुळे चांगले तसेच वाईट परिणाम आर्थिक विकासाच्या दृष्टिकोणातून होताना दिसतात. वारसा हक्कामुळे आपली संपत्ती आपल्या वारसांना मिळणार या विचाराने अधिक संपत्ती प्राप्त करण्याचा प्रयत्न केला जातो यामुळे देशाच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होते.

वारसा हक्कामुळे वाड वडीलांची संपत्ती मुला--बाळांना सहज मिळत असल्याने श्रीमंताची मुले आळशी व ऐसोआरामी बनतात. वारसाहक्क नियमानुसार वडीलांच्या मृत्युनंतर संपूर्ण संपत्ती त्यांच्या मुला–मुलीमध्ये विभाजीत केली जाते. वारसा हक्कामुळे शेतीचे विभाजन व अपखंडण होण्यास कारणीभूत ठरते म्हणुन अशा संस्थामध्ये बदल होणे आवश्यक आहे.

**३.४.२ संघटनात्मक बदल (Organizational Chagne)** संयुक्त राष्ट्र संघाच्या अहवालामध्ये स्पष्ट करण्यात आले आहे की उपयुक्त वातावरणाच्या अभावात देशाची प्रगती होणे शक्य नाही आणि उपयूक्त वातावरणाकरिता उत्तम संघटनात्मक रचना तयार करण्याची क्षमता असलेली व्यक्ती देशात असल्या पाहिजेत. प्रो. नोरमन जेकब्सने संघटन आणि आर्थिक, सामाजिक संस्थांच्या संदर्भात सांगताना स्पष्ट केले आहे की जपान आणि चिन मध्ये होणाऱ्या प्रगतीचे श्रेय उपयुक्त व अनुकूल प्रत्येक क्षेत्रातील संघटन आणि संलग्न संस्थेचे उत्तम कार्य होय.

एखाद्या देशाच्या दारिद्र्याचे कारण म्हणजे त्या देशात संघटनात्मक कौशल्याची कमतरता होय. वस्तूच्या उत्पादणासाठी योग्य संघटनपद्धती महत्त्वाची ठरते. उत्पादनासाठी आवश्यक असणारे घटक पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून त्या घटकावर योग्य नियंत्रण ठेवुन, व्यवसाय चालविण्याची जोखीम स्विकारून, व्यवसायाचा विकास घडवुन आणण्यासाठी जी व्यवस्था असते तिला संघटन व्यवस्था असे म्हणता येईल. आर्थिक विकासाच्या दृष्टिने संघटन व्यवस्थेमध्ये बदल घडूण येणे अत्यंत आवश्यक असतें. संघटनात्मक बदलाचे विश्लेषण आपणास पुढीलप्रमाणे करता येईल.

**१. कामगार संघटन :** १८ व्या आणि १९ व्या शतकात युरोपातील राष्ट्रामध्ये औद्योगिक क्रांती घडून आली. समाजरचनेत मुलभूत स्वरुपाचे बदल घडून आले. औद्योगिक क्रांतीच्या बदलामुळे कामगार वर्गाने आपल्या हिताचे संरक्षण करण्यासाठी कामगार संघटना स्थापन करण्यास सुरुवात केली.

देशातील उत्पादनाची प्रक्रिया सुरळीत चालू राहण्यासाठी कामगार संघटनेचे कार्य सुरळीतपणे चालणे आवश्यक असते. लोकशाहीच्या मुल्याचे जतन करणाऱ्या देशात कामगारांच्या हक्कांची, हितसंबंधाची जपणूक करण्यासाठी आणि राजकिय लोकशाहीला स्थैर्य प्राप्त करून देण्यासाठी प्रबळ कामगार संघटना महत्त्वाची भूमिका निभावतात म्हणुन केंद्र सरकारने आणि राज्य सरकारांनी धोरणे आखतांना कामगार संघटनाच निरोगी वाढीसाठी आणि कामगार चळवळीला योग्य वळण देण्याच्या उद्देशाने धोरण आखणे आवश्यक आहे.

**२. स्त्री संघटन :** देशाचा आर्थिक विकास सर्वांच्या मदतीने होत असतो. अर्थव्यवस्थेत उद्योग स्थापन करण्याची जोखीम उचलण्याचे धाडस स्त्री व पुरुष दोघांनी केले तर आर्थिक विकासात सफलता प्राप्त होते. म्हणून देशात स्त्री उद्योजकतेसाठी सामाजीक, संस्थात्मक वातावरण अनुकूल असण्याची गरज असते. अल्पविकसीत देशात अशा प्रकारच्या वातावरणाची कमतरता असते त्यामुळे अल्पविकसीत देशात स्त्री संघटनेकडे अधिक दुर्लक्ष झाले आहे. उद्योजकता, साहस याला वर्षानुवर्ष संघटनात्मक स्वरुप मिळाल्याशिवाय स्त्रियांचा सहभाग आर्थिक विकासात वाढविता येत नाही. आपल्या भारताचा विचार केल्यास आपल्या देशात सतीप्रथा, बालविवाह प्रथा यांच्या विरोधात आवाज उठविला गेला, लोक संघटीत झाले, कायदा तयार झाला यामुळे आर्थिक विकासात स्त्रियांचा हातभार वाढू लागला आहे.

**३. सहकारी संघटन :** आर्थिक विकासाचे साधन म्हणुन विविध क्षेत्रामध्ये सहकारी संघटन पद्धतीचा अवलंब केला जातो. आज सर्व जग सहकारी संघटनेने व्यापलेले दिसून येते. सहकारी संघटन पद्धतीमुळे देशातील कमकुवत वर्गाचा आर्थिक व सामाजिक विकास साधण्यास मदत होते. सहकारी संघटन एकनिष्ठेने, विश्वासाने, निस्वार्थपणे चालविले गेले पाहिजे. समानतेवर आधारलेला नवा समाज निर्माण करण्याचे एक साधन म्हणुन सहकारी संघटन उत्कृष्टपणे कार्य करू शकते.

अल्पविकसीत देशाच्या दृष्टिने देशातील सहकारी संघटनेला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने विविध कार्यक्रम हाती घेणे आवश्यक आहे. संयूक्त राष्ट्राच्या सर्वसाधारण परिषदने सन २०१२ हे वर्ष सहकाराचे आंतरराष्ट्रीय वर्ष म्हणुन घोषीत केले आहे. या मध्ये सामाजिक, आर्थिक, दारिद्र्य निर्मूलन, रोजगार निर्मिती, सामाजिक ऐक्य यामधील सहकारी संघटनाचे योगदान विषद करण्यात आले आहे. विविध देशात जी सामाजिक व आर्थिक प्रगती झालेली दिसते ती सहकाराशीवाय अशक्य झाली असती म्हणुन असे म्हटले जाते की 'विना सहकार नाहि उद्धार'.

**४. राजकीय संघटन :** देशाच्या राजकीय संघटन व्यवस्थेवर आर्थिक विकास अवलंबुन असतो. राजकीय व्यवस्थेत जेवढा लवकरात लवकर बदल होत राहील तेवढा देशाचा आर्थिक विकासाचा वेग मंदावतो. एखाद्या पक्षाचे सरकार अनेक पक्षाच्या मदतीने सत्तेवर निवडून आले तर ते सरकार आपला नियोजित कालखंड पूर्ण करेल याची शाश्वती नसते. मध्येच सरकार पडल्यास परत निवडणुका घ्याव्या लागतात. देशातील सरकार नेहमी बदलत असेल तर आर्थिक विकास स्थिर गतीने होत नाही.

संपूर्ण राष्ट्राच्या प्रगतीकरिता राष्ट्रिय चारित्र्याची फार गरज असते. राष्ट्रिय चारित्र्याचा अभाव असलेल्या देशात प्रत्येक वर्ग स्वत:च्या हितसंबधाचाच विचार करतो. भ्रष्टाचार प्रवृत्ती ही सामान्य बाब बनते. पैसा मिळविण्याच्या लोभाने अराष्ट्रिय कृत करण्यासाठी लोक मोग पुढे पाहत नाही. म्हणुन देशात सर्वत्र राजकीय शांतता, राजकीय स्थिरता, राष्ट्रिय चारित्र्य असल्याशिवाय देशाचा आर्थिक विकास साध्य करता येत नाही. देशात सरकारी यंत्रणा भ्रष्टाचारी, अकार्यक्षम, पक्षपाती व अप्रामाणिक असेल तर देशाचा आर्थिक विकास साध्य करणे कठीण असते. राजकीय संघटनेत विकासाला अनुकूल असे बदल घडून येणे आवश्यक असते.

**५. औद्योगिक संघटन :** १७ व्या शतकात युरोप मध्ये औद्योगिक क्रांतीची सुरवात झाली त्याचा परिणाम म्हणून उत्पादनाचा वेग व प्रभाव यात वाढ होऊ लागली. मोठ्या उद्योग संस्थांची निर्मिती होऊ लागली, उद्योग संस्थांचे क्षेत्र वाढत गेले, उद्योग संस्थाच्या मालकिचे स्वरुप बदलत गेले. मानवी विकासाबरोबर मानवी गरजा वाढत गेल्या. वाढत्या गरजा पुर्ण करणाऱ्या वस्तूंच्या उत्पादन पद्धतीत बदल होत गेला अधिक विकास, अधिक उत्पादन, अधिक रोजगार व अधिक कल्याण साधण्याच्या उद्देशाने जगातील बहुसंख्य राष्ट्र उत्पादन कार्यात संरचनात्मक व गुणात्मक बदल करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

नैसर्गिक संसाधनाचा वापर करून विविध प्रकारच्या वस्तू व सेवांची निर्मिती औद्योगिक संघटनेतून केली जाते. औद्योगिक संघटन देशात कोणत्या प्रकारे अस्तित्त्वात आहे याला विकासाच्या दृष्टिने फार महत्त्व आहे. औद्योगिक संघटनांची निर्मिती खाजगी क्षेत्र व सार्वजनिक क्षेत्र अशा दोन्ही क्षेत्रात होणे आवश्यक आहे. विशेषत: अल्पविकसीत देशात सार्वजनिक उद्योग संघटन पद्धतीला जास्त महत्त्व असते. औद्योगिक संघटनेत बदल होऊन औद्योगिक संघटनांचा विकास झाल्यास अर्थव्यवस्थेत औद्योगिकरण घडून येण्यास मदत होते औद्योगिकीकरणामुळे आर्थिक विकासाचा वेग वाढविता येतो.

**आपली प्रगती तपासा—३ क)चूक किंवा बरोबर ते सांगा.**

१. विकसीत देशातील सरकारनी सर्वप्रथम आधारभूत उद्योगांची स्थापना केली नाही.
२. आर्थिक विकासाची प्रक्रिया सतत व निरंतर चालणारी नाही.
३. श्रमिकांची गतिक्षमता जातीव्यवस्थेमुळे कमी होते.
४. शेतीचे विभाजन व अपखंडण होण्यास वारसा हक्क कारणीभूत घटक आहे.
५. सहकारी संघटन पद्धतीमुळे देशातील कमकुवत वर्गाचा आर्थिक व सामाजिक विकास साधत नाही.

## ३.५ सारांश

आर्थिक विकासासाठी देशांतर्गत घटकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. देशाचा विकास साध्य करावयाचा असेल तर देशांतर्गत घटकांचा आधार महत्त्वपूर्ण ठरतो. म्हणूनच कोणत्याही देशाचा विकास हा त्या देशाच्या अंतर्गत परिस्थितीवर जास्त अवलंबुन असतो. देशाच्या विकासाला आर्थिक घटक मदतगार ठरतात त्याच बरोबर गैरआर्थिक घटक सुद्धा तेवढेच मदतगार ठरतात. विकास ही केवळ आर्थिक प्रक्रिया नाही म्हणुन विकासाकरिता राजकीय, सामाजिक व सांस्कृतीक अनुकूलता असणे अत्यंत आवश्यक असते.

देशाचा आर्थिक विकासाचा मार्ग खुला करण्याची भांडवल निर्मिती ही प्रमुख गुरूकिल्ली आहे. अल्पविकसीत व विकसनशील अर्थव्यवस्थेत नियोजनाद्वारा जलद आर्थिक विकास घडवून

आणण्यासाठी योग्य किंमत धोरण आखणे आवश्यक आहे. देशाची राजकीय व प्रशासकीय रचना दुबळी असल्यास विकास मार्गत अडथळे निर्माण होऊ शकतात. म्हणुन विकासासाठी राजकीय आधार दृढ असायला पाहिजे. देशाचा विकास साधावयाचा असेल तर लोकांच्या सामाजिक व सांस्कृतीक दृष्टिकोणात बदल घडवून आणने आवश्यक आहे तसेच जुन्या सामाजिक रचनेतील संस्था यांचे उच्चाटन करणे किंवा स्वरुप बदलविणे आवश्यक ठरते.

## ३.६ पारिभाषिक शब्द

- **सीमान्त उपयोगिता** : शेवटच्या एका घटकापासुन मिळणारी उपयोगिता.
- **भांडवलाची झीज** : उत्पादन कार्यात वापरामुळे भांडवली साधनांची झालेली हाणी.
- **अल्पविकसीत देश** : विकसीत देशापेक्षा दरडोई उत्पन्न अत्यंत कमी असणारे देश.
- **मिश्र अर्थव्यवस्था** : भांडवलशाही व समाजशाही अशा दोन्हीचे अस्तीत्त्व असणारी अर्थव्यवस्था.
- **तुटीचे अर्थप्रबंधन** : सार्वजनिक उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असल्यास नविन नोटा छापुन उत्पन्न व खर्चातील तुट भरून काढणे.
- **भांडवल निर्मिती** : उत्पादन साधनांची निर्मिती.
- **सुप्त श्रमशक्ती** : उत्पादन कार्यात काहीच भर न टाकणारी श्रमशक्ती (श्रमशक्तीच्या वापराने)

## ३.७ आदर्श उत्तरे (आपली प्रगती तपासा)

**आपली प्रगती तपासा १**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) भांडवल निर्मितीच्या साहयाने गरिबीचे दृष्टचक्र तोडता येते.

२) नैसर्गिक साधनांचा समावेश भांडवलनिर्मितीमध्ये होत नाही.

३) शेती क्षेत्रातील की श्रमिकांची सीमान्त उत्पादकता शून्य समजली जाते.

४) स्फीती म्हणजेच भाववाढ होय.

५) अल्पविकसीत देशात लोकसंख्येचे प्रमाण अतिरिक्त असते.

**आपली प्रगती तपासा २**

**ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१. किंमत धोरणाचे

२. उत्पादन खर्चामध्ये

३. संतुलन

४. उत्पादनात

५. जास्त

**आपली प्रगती तपासा ३**

**क) चूक किंवा बरोबर ते सांगा.**

१. चूक

२. चूक

३. बरोबर

४. बरोबर

५. चूक

## ३.८ स्वाध्याय

### अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. भांडवल निर्मितीचा अर्थ सांगून भांडवल निर्मितीचे वैशिष्ट्ये सांगा?
२. अल्पविकसीत देशात भांडवल निर्मितीचा दर कमी असण्याची कारणे स्पष्ट करा?
३. भांडवल निर्मितीची विविध मार्ग सांगा?
४. किंमत धोरणाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा?
५. आर्थिक विकासात किंमत धोरणाची उद्दिष्टे सांगा?
६. आर्थिक विकासात राज्याची भूमिका स्पष्ट करून संस्थात्मक व संघटनात्मक बदलाचे महत्त्व सांगा?

### ब) लघुत्तरी प्रश्न

१. तुटीचे अर्थप्रबंधन म्हणजे काय?
२. किंमत धोरणाची साधने सांगा.
३. संस्था म्हणजे काय? संस्थेची वैशिष्ट्ये सांगा.
४. भांडवल निर्मितीचे अंतर्गत मार्ग कोणते ते सांगा.
५. आर्थिक विकासात राज्याची भूमिका स्पष्ट करा.

### क) टिपा लिहा.

१. सुप्त श्रमशक्ती (छुपी बेकारी)
२. दुहेरी किंमत धोरण
३. सहकारी संघटन पद्धती
४. मानवी भांडवल निर्मिती
५. राज्य वित्तीय धोरण

## ३.९ संदर्भ

१. कविमंडन विजय (१९७६), विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन, श्री. मंगेश प्रकाशन नागपूर--१०.
२. कुरुलकर व एकताटे (१९९१), विकासाचे अर्थशास्त्र, विद्याप्रकाशन नागपूर.
३. देशमुख प्रभाकर (१९८१), आर्थिक धोरण आणि नियोजन, पिंपळापुरे ॲण्ड पब्लीशर्स, नागपूर.
४. फडवणीस मृणालीनी (१९९८), विकासाचे अर्थशास्त्र व सिद्धांत, विद्या प्रकाशन नागपूर.

अधिक वाचनासाठी पुस्तके

१. विकास आणि पर्यावरणाचे अर्थशास्त्र — इंगळे बी.डी.
२. विकासाचे अर्थशास्त्र — कुमानाचे पी.आर.
३. विकासाचे अर्थशास्त्र आणि नियोजन — पत्की, साबळे